१२८

कर आकारणी व कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा.क्र. :- टीजीओ/२२७९
दिनांक :- ४.२.२००८

मा. महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

यांना सविनय सादर...

विषय :- सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरिता करमणूक कर व मिळकतकर दराबाबत...

संदर्भ :- मा.मुख्यसभा ठराव क्रमांक ८५, दि.१३.७.२००७.

पुणे महानगरपालिका हद्दीत असलेल्या मिळकतींवर सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरिता मिळकतकरापोटी विविध करांची आकारणी करणेबाबत करमणूक कर व मिळकतकर दरास मा.मुख्यसभेने संदर्भांकित ठरावान्वये मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत ठरावामध्ये खालील नमूद उपसूचनांचा समावेश आहे.

(१) महाराष्ट्र शासन क्र.आय.टी.पी.२००३ /सी.आर../३२११/आयएनडी-इंडस्ट्रीज एनर्जी आणि लेबर डिपार्टमेंट, मंत्रालय, मुंबई ३२, दि.१२ जुलै, २००३ महाराष्ट्र शासनाने आय.टी.आणि आय.टी.ई.एस. (INFORMATION TECHNOLOGY & INFORMATION TECHNOLOGY ENABLED SERVICES) योजना, २००३ मधील परिशिष्ट ४-६ SUPPORT OF IT & ITES UNITS BY URBAN LOCAL BODIES (b) या संस्थांना मिळकतीच्या आकारणी निवासी दराने करणेबाबत तसेच ज्या संस्थांमध्ये डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज (DIRECTORATE OF INDUSTRIES) महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र असलेल्या आय.टी.आणि आय.टी.ई.एस. संस्थांना दि.१.१०.२००३ पासून निवासी दराने आकारणी करणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२७, दि.१७.१०.२००३ ने मान्यता देण्यात आली आहे. पुणे मनपा हद्दीत व समाविष्ट गावांत आय.टी.आणि आय.टी.ई.एस.संस्थांनी भाडयाने मिळकती घेतल्या आहेत, अशा संस्थांची (करपात्र रक्कम) निवासी दराने आकारणी करणेस.

(२) मुं.प्रां.महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ अन्वये काही मिळकतींना सर्वसाधारण करात सूट देणे बंधनकारक आहे. परंतु सदर मिळकती व्यतिरिक्त काही मिळकतींना सर्वसाधारण कर आकारण्यात आलेला नव्हता, अशा सर्व मिळकतींना (धार्मिक स्थळे, प्राथमिक शाळा,वगळून) सर्वसाधारण कर आकारण्यात येत होता. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ कलम १३२ अन्वये एखाद्या मिळकतीमधील जेवढया क्षेत्राचा वापर केवळ धर्मादाय प्रयोजनासाठी होत असेल, अशा मिळकतीमधील तेवढेच क्षेत्र विचारात घेवून त्यानुसार येणाऱ्या करपात्र रकमेवर अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक १.४.२००७ पासून सर्वसाधारण करात सूट देवून आकारणीबाबत कार्यवाही करावी.